☏- 02462-244474, 234504
फॅक्स क्रं. - 02462-235103

नियंत्रण कक्ष ☏ - 02462-234720
E-mail Id- sp.nanded@mahapolice.gov.in, pronanded@gmail.com

सत्यमेव जयते
महाराष्ट्र शासन

जा.क्रं./ प्रेस नोट / 244 / पोलीस अधीक्षक कार्यालय, नांदेड /2025 / दिनांक : 20 / 06 / 2025

# नांदेड जिल्हा पोलीस दलाकडून "मिशन निर्भया" अंतर्गत शालेय व महाविद्यालयीन विद्यार्थ्यांसाठी "QR" कोड आधारीत ऑनलाईन तक्रार प्रणालीचे मा. पालकमंत्री यांचे हस्ते उद्घाटन..

महीलांच्या व विद्यार्थ्यांच्या सुरक्षीततेसाठी नांदेड जिल्हा पोलीस दलाचे "मिशन सहयोग" अंतर्गत दोन महत्वपुर्ण उपक्रमांचा प्रारंभ

1)मिशन निर्भया– मुलींच्या सुरक्षीततेसाठी,स्वसंरक्षणसाठी प्रशिक्षण व मार्गदर्शन सत्रे

2)मिशन समाधान–"QR" कोड आधारीत व व्हॉट्स अप चॅटबॉट व्दारे तक्रारींचे त्वरित निवारन

पोलीस प्रशासन आणी समाज यांच्यात विश्वास आणि सुरक्षितता निर्माण करण्याच्या दृष्टीने "मिशन निर्भया" हा एक महत्वपुर्ण उपक्रम आहे. महीलांवर होणाऱ्या अत्याचाराला प्रतिबंध घालण्यासाठी व त्यांच्या संरक्षणासाठी या उपक्रमा अंतर्गत विशेष योजना राबविण्यात येणार आहेत विद्यार्थीनी व महीला यांना स्वयंस्वरक्षनाचे प्रशिक्षण मार्गदर्शन सत्रे आणि कायदेशीर व मानसिक सल्ला दिला जातो हा उपक्रम महीलांमध्ये आत्मविश्वास निर्माण करून त्यांना सशक्त बनविण्याचे कार्य करते. सुरक्षीत आणि सक्षम समाज घडविण्यासाठी हे पाउल अत्यंत महत्वाचे ठरणार आहे.

**मार्गदर्शन सत्रे–**

यामध्ये शहरातील सर्व कोचींग इुन्स्टीट्युट आणि क्लासेस मधील जवळपास 50,000 विद्यार्थ्यांना प्रशिक्षीत करण्याचे उद्दीष्ट आहे. तसेच विशेषत: पोस्ट ग्रॅज्युएशन च्या 10,000 मुली व विद्यार्थी तसेच शाळा व महाविद्यालयीन 20,000 विद्यार्थी व 1500 शिक्षक यांना प्रशिक्षण देण्यात येणार आहे.

**विशेष प्रशिक्षण सत्रे–**

जवळपास 5000 मुली व लहाण मुले यांना पोलीस परेड ग्राउंडवर सेल्फ डिफेन्स संरक्षणाचे प्रशिक्षण दिले जाणार आहे.

विशेष लैंगीक अत्याचाराचे तपास हाताळण्यासाठी पोलीस अंमलदारांना विशेष प्रशिक्षण दिले जाणार आहे. लैंगीक अत्याचाराचे गुन्ह्याचा तपास वेळीच पुर्ण करण्यासाठी 2000 पोलीस व सरकारी वकील यांना विशेष प्रशिक्षण दिले जानार आहे. पालक व कुटुंबासाठी देखील सत्र आयोजीत करण्यात येणार असुन यामध्ये जवळपास 500 कुटुंब 25, सदस्यांचा सहभाग नोंदविण्याचे प्रस्तावित आहे. सदर प्रथम टप्यात थेट लाभार्थी 90,000 ते 1,00,000 च्या जवळपास असतील दुसरा टप्पा हा ग्रामीण भागात आयोजीत करण्याचे ठरविले आहे.

**"QR" कोड व्दारे त्वरीत विद्यार्थी व महीला यांची तक्रार नोंदणी –**

नांदेड पोलीस विभागाच्या वतीने महीला, बालक व विद्यार्थी यांच्या सुरक्षीततेसाठी "QR" कोड आधारीत तक्रार निवारण सुविधा सुरू करण्यात आली आहे. कोंचीग क्लास परिसर व इतर ठिकाणी होणाऱ्या ईव्ह–टिझींग,छेडछाड, पाठलाग,छळ,संशयास्पद हालचाली नशेच्या पदार्थांची अवैध विक्री मोबाइलचा गैरवापर यांसारख्या घटनांसाठी विद्यार्थी व महीला फक्त "QR" कोड स्कॅन करून तक्रार करू शकतात या तक्रारी थेट संबंधीत पोलीस अधिकाऱ्यांपर्यंत पोहोचतात व त्वरीत कार्यवाही सुनिश्चित केली जाते.

तसेच वरील गुन्ह्यांना जागीच प्रतिबंध व्हावा व स्त्रियांना भयमुक्तपणे संचार करता यावा म्हणुन स्ट्रिट सेफ्टी पथक कार्यान्वीत असुन यामध्ये 1) चार्ली मोबाईल पेट्रोलींग 2)पायी पेट्रोलींग 3)दरोडा विरोधी पेट्रोलींग 4)दामिनी पेट्रोलींग 5)पि सी आर पेट्रोलींग 6)पोलीस स्टेशन पेट्रोलींग कार्यान्वीत करण्यात आलेल्या आहेत.

सदर उद्घाटन समारंभ प्रसंगी मा. मंत्री श्री. अतुल सावे(मंत्री, इतर मागास बहुजन कल्याण,दुग्धविकास,अपारंपारीक उर्जा तथा पालकमंत्री नांदेड), खा. श्री अशोक चव्हाण(माजी मुख्यमंत्री महराष्ट्र व खासदार राज्यसभा नवि दिल्ली), खा. डॉ. अजित गोपछडे (खासदार राज्यसभा नवि दिल्ली), मा. जिल्हाधिकारी श्री राहुल कर्डीले व मा. श्री अबिनाश कुमार, पोलीस अधीक्षक नांदेड तसेच अन्य मान्यवर उपस्थित होते.

**मिशन सहयोग** अंतर्गत **मिशन निर्भया** व **मिशन समाधान** या उपक्रमाची संकल्पना व अंमलबजावणी **पोलीस अधीक्षक श्री. अबिनाश कुमार (भा.पो.से.) यांच्या नेतृत्वाखाली पोनि वसंत सप्रे, पो.उप.नि. मारोती चव्हाण, पोशि सांगळे,राठोड सायबर टीमच्या सहकार्याने व SETTribe द्वारा करण्यात आली आहे.** या डिजीटल उपक्रमामुळे नांदेड जिल्ह्यातील पोलीसांची कार्यपध्दती आधुनिक आणि नागरिकाभिमुख होणार आहे. महीला व विद्यार्थ्यांना आवाहन करण्यात येते की, त्यांनी नांदेड पोलीस दलाच्या या नव्या डिजिटल सेवा वापराव्या त्याचा लाभ घ्यावा आणि आपल्या अभिप्रायाने या प्रणाली अधिक प्रभावी बनवण्यासाठी सहकार्य करावे.

**जनसंपर्क अधिकारी,**
पोलीस अधीक्षक कार्यालय, नांदेड